९२३३
म. ग्रं. सं. ठाणें
वर्ग. काव्य
क्र. नं. ८५२




REFBK-0004945
REFBK-0004945

१९३३

म. रा. ग्रं. ग्रंथ संग्रहालय.
स्थळ प्रत
नं. काव्य नं. १०६४
ता. २८.५.३३
ठा.गं.

नो.नं. ६८७०

# का व्य - सु धा

[ कविता-संग्रह ]

कवि : आविनाशचंद्र

[ डॉ. रामचंद्र अनंत राईरकर, एम्.बी.बी.एस्. ]

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
नं. काव्य नं. १०६४
ता. २०/५/३३
ठाणे.

REFBK-0004945

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ६७७०
ठाणे.

दा. क्र. ४८७५

प्रकाशक—गणेश महादेव आणि कंपनी, पुणें शहर

किंमत १२ आणे

८०५३

१०८४ ता॰
२५/५/३३

८०५३

मुद्रक व प्रकाशक: गणेश महादेव वीरकर
'साहित्य-सेवक' छापखाना, ६०८ सदाशिव पेठ, पुणें शहर
मार्च, १९३३

[या व पुढील आवृत्तींचे सर्व हक्क प्रकाशकाकडे आहेत]

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ६७८०
ठाणे

चिरंजीव शकुन्तलेस

काव्य २८।८३३+८०+

# अनुक्रमणिका

मराठी ग्रंथ संग्रहालय नोंद नं. ...


| | विषय | पृष्ठ |
|---|---|---|
| | निवेदन ... ... ... ... | ७ |
| १ | प्रार्थना ... ... ... ... | ९ |
| २ | तान्यांचें गाणें ... ... ... ... | १० |
| ३ | बाळाचें हास्य ... ... ... ... | १२ |
| ४ | एक दृश्य ... ... ... ... | १३ |
| ५ | उत्कंठा ... ... ... ... | १५ |
| ६ | उषा ... ... ... ... | १७ |
| ७ | स्वत्वाची जाणीव... ... ... ... | १९ |
| ८ | बालकवींचें गाणें... ... ... ... | २२ |
| ९ | हृदयाची आशा ... ... ... ... | २४ |
| १० | चंद्राची उपमा ... ... ... ... | २६ |
| ११ | सागरास ... ... ... ... | २७ |
| १२ | गोड आशा ... ... ... ... | २९ |
| १३ | समाधान ... ... ... ... | ३१ |
| १४ | एक दृश्य ... ... ... ... | ३२ |
| १५ | वरुणास ... ... ... ... | ३३ |
| १६ | ऐसें मना आवडे... ... ... ... | ३५ |
| १७ | इन्दुलतेस ... ... ... ... | ३६ |
| १८ | सदाफुलीस ... ... ... ... | ३८ |
| १९ | मन ... ... ... ... | ४० |
| २० | प्रणयिनीस ... ... ... ... | ४१ |
| २१ | पौर्णिमा ... ... ... ... | ४३ |
| २२ | भावोत्कर्ष ... ... ... ... | ४५ |
| २३ | भलतें वेड ... ... ... ... | ४६ |
| २४ | सागरास ... ... ... ... | ४८ |
| २५ | शनिवारवाडा पाहून ... ... ... | ५१ |

| विषय | पृष्ठ |
| --- | --- |
| २६ ऊन्ह आणि पाऊस ... ... ... | ५४ |
| २७ इन्दुलतेस ... ... ... ... | ५६ |
| २८ गोविन्दाग्रज ... ... ... ... | ५८ |
| २९ कल्पना आणि व्यवहार ... ... ... | ५९ |
| ३० ताज-महाल ... ... ... ... | ६० |
| ३१ गोपाळ कृष्ण गोखले .. ... ... | ६२ |
| ३२ भग्न-हृदया ... ... ... ... | ६३ |
| ३३ बालमूर्ति ... ... ... ... | ६४ |
| ३४ साहित्यसंमेलनास ... ... ... | ६५ |
| ३५ पं. मोतीलाल नेहरू ... ... ... | ६६ |
| ३६ नांवाची जादू ... ... ... ... | ६७ |
| ३७ स्फूर्ति ... ... ... ... | ६८ |
| ३८ दर्पण ... ... ... ... | ६९ |
| ३९ हरि नारायण आपटे ... ... ... | ७० |
| ४० विजयिनी ... ... ... ... | ७१ |
| ४१ स्वातंत्र्यशाहीर गोविंद यास... ... ... | ७३ |
| ४२ प्रणाम ... ... ... ... | ७४ |
| ४३ सूर्योदय ... ... ... ... | ७५ |
| ४४ आकाशगंगा ... ... ... ... | ७७ |
| ४५ विरोधाभास ... ... ... ... | ७८ |
| ४६ लकडी पूल ... ... ... ... | ७९ |
| ४७ गोड भास ... ... ... ... | ८० |
| ४८ विवाह आणि प्रेम ... ... ... | ८२ |
| ४९ हे व्यर्थ झाले श्रम! ... ... ... | ८३ |
| ५० धर्माची महती कशास! ... ... ... | ८४ |
| ५१ साहित्यसम्राट केळकर ... ... ... | ८५ |
| ५२ महात्मा गांधी ... ... ... | ८६ |

काव्य- १०६५
२८/५/३३
मराठी ... संग्रहालय
नोंद नं. ६६८०
ठाणे.

# निवेदन

मराठी वाङ्मयांतील निरनिराळे प्रकार धडाडीनें प्रसिद्ध करण्याचें हल्लींचें युग आहे. त्यांतल्या त्यांत सध्यां लघुकथेकडे तरुणांचें लक्ष विशेषत्वानें लागलें आहे. लघुकथा, लघुनिबंध वगैरे प्रकारांच्या प्रसिद्धीकरणांत कवितेची हेळसांड होत असेल अशी जर कुणाची समजूत असेल तर ती मात्र चुकीची आहे. एवढें मात्र खरें कीं केशवसुत, गोविंदाग्रज, बालकवि, टिळक वगैरे कवि जिवंत असतांना कवितेचा बोलबाला जितका होत होता तितका तो हल्लीं नाहीं. वस्तुतः त्या वेळीं कवींची संख्या व कवितेचा दर्जाहि थोडा कमीच होता. पण हल्लीं वाङ्मयाची वाढ झपाट्यानें होत असल्यामुळें त्यापेक्षां सरस काव्य असूनहि तितकी प्रसिद्धी मिळणें जड जातें. तरीहि तांबे, चंद्रशेखर, माधवराव पटवर्धन, यशवन्त वगैरे कवि लोकांच्यापुढें प्रामुख्यानें आहेत. हल्लीं कवितेची गोडी व कवींची प्रसिद्धी निराळ्याच एका गोष्टीनें जास्त प्रमाणांत होत आहे व ती गोष्ट म्हणजे कवितागायन ही होय. ज्या कवींच्या कवितेला कवितागायनाची जोड मिळाली असेल त्याची प्रसिद्धी विशेष होणार हें उघड आहे. तरी पण ज्यांची कविता खरोखरच चांगली आहे त्यांना या उपाधीशिवायहि प्रसिद्धी मिळूं शकते. अशा कवींत, चंद्रशेखर, निशिगंध, य. न. केळकर वगैरे कवींचा समावेश होतो.

कविता प्रसिद्ध करावयाची म्हणजे त्याला कांहीं विशिष्ट हेतु असावा लागतो, किंवा त्या कवितेचें कांहीं तरी वैशिष्ट्य असावें लागतें. अनिलांच्या फुलवागेंत प्रतीतिधर्माकडे कवितेचा कल झुकला आहे, निशिगंधांच्या

प्रेमगीतांत एक निराळेंच वैशिष्टय आहे, माधवरावांच्या गज्जलांनीं व एका तऱ्हेच्या नवीनच धडाडीनें त्यांनीं रसिकांना आपलेंसें केलें आहे; अशा दृष्टीनें कांहीं वैशिष्टय नसतांहि कविता प्रसिद्ध करणें याला एकच कारण असूं शकेल, आणि तें म्हणजे हौस हें होय. प्रस्तुत पुस्तक अशापैकींच एक आहे. अर्थात् उपरिनिर्दिष्ट कवींत हौसेचा अभाव असतो असें नव्हे; आणि दुसरें नुसत्या हौसेनें प्रसिद्ध केलेल्या कवितेंत कांहीं महत्त्वाचे गुण नसतात असेंहि नाहीं.

प्रस्तुत पुस्तकांतील बऱ्याचशा कविता निरनिराळ्या मासिकांत व वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झाल्या आहेत, त्या पुनर्मुद्रित करण्यांत येत आहेत. ज्या संपादकांनीं या कवितांना आस्थेनें प्रसिद्धी दिली त्यांचा मी फार आभारी आहें.

याव्यतिरिक्त ज्या निकटवर्ति प्रेमळ, आप्त व स्नेही मंडळींची मदत झाली त्याबद्दल त्यांचे नुसते आभार मानणें अर्थात्‌च शक्य नाहीं. त्यांचें प्रेम आभारापलीकडचें आहे; शिवाय दुसरें असें, कीं त्यांच्या नांवाचा उल्लेख केल्यानें त्यांचा गौरव होईल असेंहि नाहीं.

आंबराई कँप, पुणें ४
वर्षप्रतिपदा, शके १८५५

रामचंद्र अनंत राईरकर

# काव्य-सुधा

## प्रार्थना

प्रभो! क्षणभरीहि ना तव सुनाम येतें मुखीं
न चित्त-सुखदा तशी सदय मूर्ति ये सन्मुखीं
रिघे न मति चंचला सतत त्वद्गुणा ध्यावया
सुवृत्त जरि चित्त हें प्रबल व्यापिलें माय या

विचार सुचती किती, उगिच धांवते कल्पना
न ये कृतिमधें कधीं, हृदयिं राहती भावना
सुवृत्ति-पथ सेवुनी वश करूं प्रयत्नें मना
अशी रुचत रीति ती परि असाध्य ही कामना

तुझेंच भरलें जगीं यश मनोहरा सर्वदा
न तें परि दिसे अम्हां, म्हणुनि येति या आपदा
परस्पर मनाप्रती विमल विश्वबंधुत्व तें—
तुझें अखिल जीवनीं पटतसे न अद्वैत तें

तुझेंच जगिं तेज तें म्हणति सूर्यचंद्रप्रभा
तुझेंच जगिं हास्य तें जलतरंगिं ज्याची प्रभा
नवोनव दिसे सदा सुखद सृष्टिचें रूप हें
दिसो सतत लोचनां, हृदयपूर्ण होवो तयें

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
स्वतंत्र प्रत
नं. काव्य नं. १०६७
ता. २९-५-३३
ठाणें.
मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ६७८०
ठाणें.
६९५४

# ताऱ्यांचें गाणें

अभिनव कोमल तारांनीं
सृष्टिदेविच्या बाळांनीं
प्रफुल्ल दिसतें आज गडे
तारांगण हें चोंहिंकडे
खेळगडी हें ।
उत्सुक पाहे
सर्वहि नानाविध खेळ । खेळाया झाले बाळ ॥

प्रौढपणाचा टेंभा हा
कोण मिरवितो इथें पहा
रागानें सरतां पुढतीं
सर्वांना वाटे भीति
कोणी लपती ।
कोणी पळती
चोरुनि हलके बघती तों । बालचंद्रमा नभिं दिसतो ॥

रागाचा उसन्या कोठें
टिकतो क़ा आविर्भाव ?
भाव खरा हृदयामधला
हृदयांना तेव्हां पटला
दुडुदुडु धांवुनि ।
पुढें येवुनी
सस्मित वदनाला बघतां । भीति उडाली पार तदा ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
नोंद नं. ६५०७

बघुनि सहोदर दादातें
भावंडें जमलीं तेथें
'मी' 'मी' म्हणुनी पुढें पुढें
जातां वेगें कोणि पडे
झरझर उठुनी ।
हस्ता धरुनी
बागडती इकडे तिकडे । तारांगणीं ते चौंहिंकडे ॥

अवनितलावरि सोन्याचा
भाग दिसे आदर्शाचा
जलनिधिच्या अन्तर्भागीं
रूप बिंबलें सर्वांगीं
वीचि समागम ।
होइ मनोरम
हर्षवी बाळ-सुहृदांना । प्रेमानें सागरराणा ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
नं. ... नं. १०६५
ता. २०.५.३३
ठाणें.

ताऱ्यांचीं सुंदर बिंबें
खेळती तरंगांसंगें
आणण्या सुधाकर चंद्र
सामोरा जाइ समुद्र
प्रफुल्ल वदनें ।
वीचि करानें
चुंबतो इंदु मयुरवांना । प्रेमानें सागरराणा

मे, १९१९ अलिबाग.

# बाळाचें हास्य

बाळ तान्हें मनिं काय सौख्य पावे ?
सतत हंसतें जें वदनिं मनोभावें
बघुनि नवलाची सृष्टि पुढें सारी
हृदयिं वाटे आश्चर्य तया भारी !

वदनिं बाळाच्या नाचतां सुहास्य
मधुरतेनें लाजवी गुलाबास
हृदयिं धरुनी चुंबुनी त्यास पाही
मनीं झालीं कृतकृत्य बाप-माई

हंसुनि सकलां हंसवितें घरादारा
रडुनि हृदया लावितें परी घोरा
अशा दोन्ही सुखदुःखमयी वृत्ती
सदा जगतीं पटवुनी मना देती

अंतरंगीं रंगलें चित्त याचें
म्हणुनि वदनीं मधुहास्य सदा नाचे
बहिरुपाधी जगतांत जशा कांहीं
अंतरंगीं तल्लीन त्यास पाही

हंसुनि सुचवी उलगडे काय कोडें
काय ठरवी वेदान्त जगीं वेडें
वेदवेदान्ता त्यजुनि सर्वकाळ
बाळहृदयापरि खेळुं चला खेळ

जून, १९२० पुणें.

# एक दृश्य

रम्य उपवनिं या शान्त दालनांत
लांब बाजूला खाट कोपऱ्यांत
स्वच्छ वरती घातलें पांघरूण
आंत बाला झोंपली कळाहीन

तेज खेळे नयनांत खोल कांहीं
फुगिर गालांची कडा खालती ही
शुभ्र झांकी हा झगा शरीराला
अस्थि-पंजर जणुं आंत लपविण्याला

हास्य गालीं खेळतें सदोदीत
स्वस्थितीची जाणीव लुप्त होत
गोड बोले परिचारिकेस बाला
हीच वाटे शान्तवी दुःखिताला

नित्य बघुनी तिज उगिच धीर द्यावा
योग्य उपचारें काळ कंठवावा
वैद्य झाला तरि काय तो करील
हास्य वदनीं, परि हृदयिं पडे पीळ

करुणरसमय मूर्तीच पुसे त्यातें
'आयु आहे का वदा अभागीतें'
वृत्ति उत्साही आज करुण-पूर्ण
हृदयिं गेले ते बोल झणिं भिनून

धीर देण्याचा बळें यत्न केला
आणि कळलें तें सर्व बालिकेला

*　　*　　*

पुन्हां आशेची वृत्ति परत आली
क्षणिक ऐहिक गोष्टींत वृत्ति धाली

# उत्कंठा

बोल मनींचे बोलावे हृदयामध्यें कल्पावे
कल्पनेंतची ते स्फुरती अनुभव परि कां ये जगतीं ?
ते प्रेमाचे ।
आनंदाचे ।
बोल सुखाचे
हृत्कमलाला उमलवुन जाति मनीं कोमेजून

सृष्टि गडे होईल कधीं काव्याची भाव-समाधी
काव्य-सृष्टिला कल्पावें आणि मनीं आनंदावें
परि तें कुठलें ।
कल्पनेंतलें ।
सुख जें फुललें
फुलुनि सदा का राहतसे ? कोमेजुनि का जात नसे ?

काय अशा जगतीं जगणें मनास तेथें तोषविणें
फुलतां फुल जेथें सुकतें यौवन वार्धक्यीं शिरतें
बालपणाची ।
फुलामुलांची ।
आनंदाची
वृत्ति कुठें जगतीं टिकते हृदयाला जी सुखवीते

काव्यमयी व्हावी सृष्टी हीच मनीं आशा मोठी
फुलामुलांच्या वृत्तींत एकजीव व्हावें जगत
भाव मनींचे ।
सुखदुःखाचे ।
त प्रेमाचे
काव्यसृष्टिच्या जीवांत एकजीव ते व्हावेत

आणि मनाला जें दिसतें हृदयामध्यें उद्भवतें
सदा स्फुरावें जगतांत तेंच सर्वही हृदयांत
आशा एकचि ।
ही हृदयाची ।
मुक्या मनाची
कधीं तरी का होतील पूर्ण मनांतिल हे बोल !

३-६-१९२२, पुणें.

# उषा

वरि नभीं
राहुनी उभी
कोण ही हंसते
पाहुनी, सुधामय इंदुबिंबही ढळतें

रम्यता
वदनिं पाहतां
हृदय झाणिं मोही
परि इंदुकलेची तारांबळ कां होई ?

हांसुनी
हळुच पाहुनी
पुढें जी येई
लाजली-पळाली, काय तरी ही घाई ?

मधु लालि
चरणयुग उधाळि
रक्तिमा मिसळे
दशदिशां गुलाबी पादधूलि कां उसळे ?

जावुनी
परत पाहुनी
नयन पडद्याच्या
आड ती दडाली, कशी ? न कळते हृदया

मधु उषा
पाहुनी अशा
मधुर चंद्राला
गालांत हांसतां, गगनगोलही हंसला

वरि अर्जुनि
लालि उसळुनी
पसरते गगनीं
हृदयास उमलवी फुलवि सकलही अवनी

शान्तता
दिव्य पसरतां
अखिल या भुवनीं
मधु लालि सर्वं ती शिरते अन्तःकरणीं

पावित्र्य
दिसे सर्वत्र
नांदतें जगतीं
वाढवी मनांतिल श्रद्धा आदरबुद्धी

लागतो
मना सुखवितो
एकची छंद
ह्या उषासमयिं या स्मरूं ईश्वरा सतत

२०-१-१९२१ पुणें.

# स्वत्वाची जाणीव

नाचतात नयनापुढती । कागदीच घोडे येथ
कवटाळुनि खोटें नाणें । होतात दंग हर्षांत
स्वार्थाच्या नजरेपुढती । संपत्ति खेळते त्यांत

खेळणार खेळुनि गेले
खेळ तरी तुम्हां कुठले
हातपाय बांधुनि बसले

स्वार्थाचे बंदे जीव । ना स्वार्थ नसे परमार्थ
स्वार्थाची ओळख कुठली । मंदभाग्य आम्हां होतें
परि पाहुनि नकली सोनें । हृदय झणीं मोहुनि जातें
सोन्याचा निघतो धूर । कल्पनेंत ऐकूं येतें

नांवाचें सोनें मोतीं
सत्याची करिती माती
डोळ्यांवर झांपड येती

हीनदीन करुनी सकलां । स्वत्वाची केली चोरी
लखलखाट वरचा नुसता । या सुधारणा नांवांत
दिपवुनी वरी नयनांना । फसवि आंत हातोहात
दासत्व पावली बुद्धी । मग काय उरे देहांत ?

बुद्धिभेद हृदयीं माते
स्वत्वाची ओळख बुजते
स्वहिताची होळी करते

ही सुधारणा स्वार्थाची । आसुरीच अन्या गमते

इतिहास दावुनी उलटा । अभिमान-ज्योत विझवाया
ज्ञानाचें अवडंबरही । माजवुनी सारे वायां
एकीची केली बेकी । स्वातंत्र्य दूर ढकलाया

ममतेचा दावुनि पूर
पाजिलें अंतरीं जहर
हा दैत्यांचा व्यवहार

स्वत्वाचा करुनी अंत । नागविलें सर्वस्वाला

भाळाला लावुनि हात । हतभाग्य म्हणुनि बोलावें
दैवाला ठेवुनि नांवें । आलस्यीं दिन कंठावे
बोलण्यांत खंदे वीर । कृतिसमयीं कां परतावें ?

नामर्दपणा हा असला
येईल काय कामाला
काळिमाच पुरुषत्वाला

त्या पूर्वज पुण्यात्म्यांना । नरकांत काय ढकलावें ?

तो बाणा कोठें गेला । मरहट्टा नांवामधला ?
तो तुम्हां शिवाजीराजा । आज कां पारखा झाला ?
तो वीर-पराक्रम तुमचा । आज कां लयाला गेला ?

ते तुम्ही याच देशाचे
कृष्णेचे भीमथडीचे
बच्चे त्या पुण्यात्म्यांचे

हृदयाचे डोळे फिरतां । हेंही कां विसरुनि गेलां ?

या हीन-दीन जनतेमध्यें । सळसळे रक्त शिवबाचें
या हीन-दीन जनतेमध्यें । सळसळे रक्त वीरांचें ?
निःसत्त्व वरुनि जरि दिसले । छावेच तरी सिंहाचे

स्वत्वाची ओळख पटतां
व्याघ्रत्व दृष्टिला दिसतां
हृदयांतुनि उसळुनि आतां

ती वृत्ती वीरत्वाची । संचरेल राष्ट्रामध्यें

दादर–पुणें.

---

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
ग्रं. क्र. ८१४५
शाखा

# बालकवीचें गाणें

फुलराणीचें गोड सखे गाणें गावुनि मन हरिखे
बालकवी गाउनि गेला हृदयाच्या दिव्यत्वाला
काय तिथें ? गोडचि सारे हृदयाचे सर्व पसारे
तत्त्व गोड बोलहि गोड हृदयाची मिळतां जोड
अन्तरसृष्टीचें जनितें प्रेमपूर्ण हृदयाचिं गमतें
तेथुनीच प्रतिभा उठते तेथुनीच वाणी स्रवते
हृदयींच्या बोलुनि बोला वेधि सदा जनहृदयाला
नादयुक्त गाणें गातो जनहृदयीं त्या गुंगवितो
भ्रमरचि हा गुंगत राही फुलराणीचा गोड कवी
निर्झरही ताना घेई त्यासंगें गुंगत गाई
गाण्यांताचि उकलुनि सांगे हृदयाच्या गाण्यासंगें
प्रेमाचे, आनंदाचे, गूढ बोल निर्झरिणीचे
दिव्य तारका गगनांत शापें अस्तंगत होत
सृष्टीचे गायक बनती भानहि जगताचें हरती
कार्य जगांतिल संपवुनी वरती मग जाती गगनीं
परि हा ऐन ज्वानींत हाय होई उल्कापात
ध्रुवस्थानिं गगनींच्या कां जाण्याचा धरिला हेका ?

गुंगतची वरती गेला आत्मा तव दिव्यत्वाला
गानयुक्त जीवित सारें गाण्यांताचि आत्मा वितरे
गान एक दिव्यत्वाचें बालकवे तव हृदयाचें
गान तेंच गुंगत जावें हेंच जगीं स्मारक व्हावें

१-१-१९२२, कोरेगांव-स्टेशन.

# हृदयाची आशा

ही एक मनाची आशा । हृदयाला मोहुनि टाकी
देणें का देवाघरचें । कोणाला कळतें लोकीं ?
होणार न कळतें कोणा । होतें तें एकाएकीं

परि उंच भराऱ्या वरती
हृदयांत सारख्या उठती
त्या एक भावनेभंवतीं

जमतात मूढ हृदयाच्या । कल्पना जिवाभावाच्या

जगताच्या संगीताचे । कविहृदयीं ध्वनि उठतात
तेथुनी प्रतिध्वनि त्यांचे । जगतांत फिरुनि येतात
तेंच गीत कविहृदयांचें । कवि सर्वदाहि गातात

ते बोल मुक्या हृदयाचे
जगताला वेड तयाचें
त्याविणें भाव हृदयाचे

कुठले मग उद्भवतात । निःसार गमे हें जगत

हृदयांतिल तें संगीत । हृदयांत सदोदित गावें
गाउनी अन्य हृदयांना । प्रतिशब्द सदोदित द्यावे
जगताच्या गाण्यामध्यें । हृदयगीत मग झुलवावें

ही आशा एक मनाची
हृदयाच्या आनंदाची
भावना मुक्या जीवाची
आशेनें फुलतो जीव । तेथेंच मनींचे भाव ॥

८-६-२२, पुणें.

# चंद्राची उपमा

सुधारसाला जगीं निर्मिशी
सुधाकराची तुज पदवी
काय तुला उपमा द्यावी ?
जड जगताच्या मर्त्य जनांना
उपमा तव ते देण्यासाठीं
निर्मि तुला कां जगजेठी ?
दिव्यत्वाची बरोबरी कां
उगीच कोणीही करणें
आणि स्वताला हिणवीणें ?
दिव्य भावना मनिं ज्या वसती
देउनि त्यांना मूर्तपणा
त्यांना कां उपमा द्या ना ?
प्रेमलतेला मनीं कल्पुनी
दिव्यत्वाची ती देवी
तिलाच ती उपमा द्यावी
घडोघडीं कां इंदुकलेला
सिद्द्यांची दासी करणें
उपहासास्पद बनवीणें
गगनांतिल तो दिव्य चंद्रमा
गगनाला शोभा आणी
हेंच सदा यावें ध्यानीं

७-१-२३, कुर्ला.

# सागरास

चहुंकडे
पसरला पुढें
वीचि संभार
मृदुतेंत शान्तवी हृदयाचा हा भार

मृदु मधुर
भासतें तीर
तुझे लहरींनीं
सागरा, स्फुरवितें लहरी हृदयामधुनी

लहरींत
मिसळतें येथ
दिव्य जें तेज
मन्मना उजळवी, उमलवि हृदया आज

दशदिशा
जाहल्या कशा
तमोवृत साऱ्या
तेजार्थ विरह कां सुकवी त्यांच्या हृदया

हृदयांत
लहरि उठतात
तरंगांसंगें
तव हृदयिं पावती एकरूपता वेगें

तव लहरि
उसळतां वरी
होत जो नाद
निःशब्द वाटते वाणी उठते त्यांत

तें गीत
नादवी सतत
हृदय मम सखया
मोहुनी मनाला, दिव्य पसरवी माया

१८-५-२४, कुर्ला.

# गोड आशा

[ एका बालिकेस ‘आपण दोघि मैत्रिणि गुलाबाचिं फुलें’ हा चरण आपल्याशींच गुणगुणतांना पाहून ]

किति गोड बोल हे म्हणशी जे ठसक्यानें
दाविती उघड तें हृदयाचें तव गाणें

मधु अर्धोन्मीलित गोड तुझ्या हृदयानें
ते गुलाब कोमल लाजविले मृदुतेनें

किति नयनमनोरम गोड गुलाबी सुमनें
विखुरलीं जगीं या रमतीं प्रेमलतेनें

हें फुलांमुलांचें गोड ऐक्य हृदयाचें
लावितें मनाला वेड त्याच आशेचें

कीं जीव आपुला एकजीव होऊन
त्या फुलांमुलांच्या हृदयीं जावा विरून

संगीत तुझें हें अर्थशून्य जरि तुजला
नादवी सर्वदा परि तें मम हृदयाला

तो अर्थ त्यांतला सांगुं कसा मी तुजला?
तव हृदयीं भरला, वदनावरती ठसला

त्या गोड गायनीं जीव तुझा गुंगावा
हें भाग्य केवढें, कळे न परि हें तुजला

ही अर्थशून्यता अशीच तव राहूं दे
त्या गोड मोहिनीमधें जीव गुंगूं दे

मम हृदयाला हें भाग्य सदा लाधावें
ही आशा एकचि हृदय तुझ्यासम व्हावें

२-९-२४, कुर्ली.

# समाधान

असेच जातिल आयुष्याचे दिन सारे यापुढें
उगिच ती चिंता हृदया जडे

मनोरथांची उडी जातसे हृदयाच्या पलिकडे
तयाला जीव पुरा का पडे ?

अपूर्ण होतां उच्च भराऱ्या मन होतें हिंपुटी
बापुडें निराशेंत घे बुडी

मग कशास आशा अशक्य कोटींतल्या ?
बेसुमार मग कां मनोरथांच्या उड्या ?
हें उघड सत्यही कळे न कां तुज, गड्या ?

असेल संचित तें तें होइल सचिंत कां मग फुका
हृदयीं धुग्धुग् ही व्यर्थ कां ?

# एक दृश्य

वैद्य आला पाहुनी कवाडांत
दीन बालेला हर्ष हो मनांत
परी बाला झांकिते घट्ट पोटीं
हृदयशय्येची ऊब तया मोठी

हर्ष-पूर्वा भीतीस सोडुनीया
बाळ काढी पदरास सारुनीया
आणि वैद्याच्या निरखिते मुखातें
सूक्ष्म फरकाची छटा पाहण्यातें

वैद्य धरुनी नाडीस एक हातें
धीर देउनि बोलला माउलीतें
हळुच लावुनि छातीस नळी पाही
शान्त सारें, शब्द ना तिथें कांहीं

हृदय धडधडतें तेवढें तियेचें
आणि श्वासोच्छ्वास ते बालकाचे
बालहृदयाची सूक्ष्म हालचाल
तिच्या हृदया बसतात तेच झोल

बघे वैद्याचें वदन मध्यें जेव्हां
जीव खालीं पडलाच तिचा तेव्हां
आणि चरणां लावुनी एक हात
म्हणे 'बाळा वांचवा, कृपावन्त'

३१-७-२६, पुणें.

# वरुणास

अरुण-उषेच्या संगम बघण्या
प्रफुल्ल होते सारी दुनिया
कविहृदयांची प्रसन्न माया
लाल गुलाबी जगतासंगें लाल गुलाबी होय

परि तव संगम कोणासंगें
स्त्रीहृदयाविण का तुजभागें
कोणाची जगिं आशा लागे
कोण असा मग वेडा सांगे त्वत्संगें येईल?

रात्रीची का कल्पुनि काया
ती तुज गणणें का मग जाया
परि रात्रीची भेसुर माया
तव हृदयाला प्रसन्नता ती देइल का कधि सांग

रविरायाच्या मार्गावरती
अरुण-उषा मधु पुष्पें उधळति
गुलाबीच ती लाली पुढती
मधु हृदयांचा रंग उधळिला दोघांच्या प्रेमांत

तो प्रेमाचा तो हृदयाचा
दों हृदयांच्या एकत्वाचा
गुलाब सुंदर अन्तरंगिचा
रविरायाच्या पदकमलावरि अर्पित अरुण उषा

बालरवीच्या नयनांपुढती
अरुण उषेचे गुलाब फुलती
वृद्धत्वाच्या मार्गावरती
अंधाराविण काय तयाला मग पुढतीं दिसणार ?

उदासीनता रविरायाची
दूर कराया वा रात्रीची
हारी घेउनि मधुपुष्पांची
लगबग लगबग त्या मागुनि कां जाशी रविसदनांत

प्रेममयी ही अवघी दुनिया
प्रेमावांचुनि सारें वायां
धडा हाच घे मग गिरवाया
प्रेमावांचुनि अंधाराची जोडी तुज मिळणार

अरुण-उषेच्या हृदयामध्यें
प्रेम एकची सदैव फुलतें
तेजोमय मग दुनिया बनते
प्रेमावांचुनि अंधाराची दुनिया तुज मिळणार

६-८-२२.

# ऐसें मना आवडे

भावांच्या दंवबिंदुंनीं थबथबे हृत्पद्म जेव्हां सखे
प्रेमाचें नव तेज त्यांत विलसे सूर्यप्रभेसारखें
आनंदात्मक सौख्य हीच पसरे तेथें प्रभा भौंवतीं
काव्याची मधु भावनाच वरिते वा मूर्त रूपाप्रती

चित्ताची फुलबाग जी फुलतसे त्या रम्य सृष्टीमध्यें
जावें संतत अंतरंग रमुनी भृंगापरी त्यामध्यें
किंवा गोड गुलाब जो विकसतो बागेंत एकीकडे
व्हावें जीवित लीन त्यांत अपुलें ऐसें मना आवडे

देई मत्तनुला मनोरम तुझी प्रेमा गुलाबी छटा
तैशी कोमलता तुझी चिमुकल्या ती गोड वृत्ती सदा
देवी कल्पकते, तरंग स्फुरवी उद्यान-वातांतुनी
पुष्पाचा मधुगंध दे उधळुनी दाही दिशां नेवुनी

चित्ताच्या मधुकल्पनेंत फुलतें हें पुष्प चेतोहर
जीवाचें असलें मनोरम कधीं होईल रूपान्तर ?

२३-५-२४, कुर्ली.

# इन्दुलतेस

ती तुझी सुखाची वृत्ती । इन्दुलते गगनावरतीं । पसरली
मृदुहास्य तुझ्या वदनींचें । नादयुक्त हृदयीं नाचे । चहुंकडे
त्या लहरी मंदत्वातें । पावती कुठें ना कळतें । अजुनही
सारखे
उसळुनी सखे
अखिल या जगतीं
मधु तरंग हृदयावरती । पसरले

तुजसाठीं तळमळणारें । जग हें बघ झालें सारें । प्रेमले
तव प्रेमाच्या आशेनें । भारलीं सर्व हीं भुवनें । प्रेमले
तव दर्शनसुख लाधावें । हीच मनीं आशा लागे । प्रेमले
जीवास
वेड हें खास
लागलें एक
दिङ्मूढ जीव हे देख । जाहले

तें अन्तरंग सिंधूचें । कां उचंबळुनिया नाचे । एकटें ?
दिसती न अन्य कां हृदयें । प्रेमानें भरलीं, सखये ! । या जगीं
तें पुढें दिसे नयनाला । म्हणुनी कां पटतें सकलां । सर्वदा ?
हा असा
मानव कसा ?
दिसे जरि गोड
वरवरचा नटवा थाट । साजणी

ते मूक बोल कळती ना? । जीवांस एकमेकांना । प्रेमले !
ते गुलाब हृदिं फुलती ना? । प्रेमलता पल्लवितांना । प्रेमले
ते गुलाबीच उठतीना! । गोड ठसे हृदयीं नाना! प्रेमले
प्रेमले
एकची फुले
प्रेमलतिका ही
हीं तिचीं फुलें बघ हृदयीं । उमलती

या फुलत्या पुष्पावरुनी । मंद तेज पसरे गगनीं । चहुंकडे
ही सुधाच उसळे भवतीं । मोहमुग्ध झालें जगतीं । जीवन
हें गोड सुधारसपान । जगताला दुसरें भान । ना उरे
जीवना
देति कल्पना
त्याच त्या फिरुनी
सुखविणें हृदय तीं गाणीं । गावुनी ।

२३-१-२७, पुणें.

# सदाफुलीस

सदाफुलीचें फूल खरोखर हंसरें हें सारखें
इतर जरि गुण त्याला पारखे

संवत्सरभर सदा फुलावें हेंच तया ठाउक
असावें अपुलें हंसरें मुख

दैवाधीनच गुणावगुण परि जीवन मार्गावरी
राहणें राहे अपुल्या करीं

मग हिरमुसलें कां मुख करणें बापुडें
निज वृत्ति सुखविण्या मार्ग न कां सांपडे ?
हंसण्याचें तिजला वेड सदाचें जडे

एकच राहे लक्ष तियेचे स्वीकृत मार्गावर
तेंच तें ठसलें हृदयावर

बांधा नाहीं सुबक मनोरम मोगरि ना मालती
मनाला वेड कशी लावि ती ?

हस्त पसरिले सर्व दिशांना धरुनी कोमल कळ्या
मनाच्या वृत्तिच त्या मोकळ्या

येतां जातां कुणी पाहतां फुलविति अपुल्या फुला
फुलविण्या सकलांच्या वृत्तिला

परि असतें कुठलें असलें साधें मन
जें बघतां होइल प्रेमानें उन्मन
या ठेविल प्रेमें हृदयाशीं कवळुन
परि वेडीचा भ्रम हा सारा निरसे एका क्षणीं
जगीं ना भेटे असलें कुणी

वास फुलांचा जरि न दरवळे उद्यानाभौंवतीं
सुवासें वेडावे ना मती
गंधलोलुपा सर्प-जातिचें नाहीं जरि वेष्टण
तरीही येति न जवळी जन

सुजन कुजन वा तिला सारखे बघे न दुर्वृत्तिला
वृत्तिमधिं साम्य भाव बिंबला
कुणि येवो अथवा जावो अपुल्याकडे
हंसऱ्याच फुलांना उधळुनि चौंहींकडे
फुलविणें जगाला हेंच तिला आवडे
हिणवूं दे जग तुला, साजणी, मनि न त्याची क्षिती
तव फुलें ईशपदीं राजती

~~~~~~

मराठी ग्रंथ संग्रहालय, स्थळ प्रत सं. ........ नं. ........ ता. ........ ठाणे.
~~~~~~

# मन

कल्पकतेचा व्यर्थ पसारा नको मनाला परी
विरुनि तो जावा वरच्या वरी

विचार-लहरी नित्य मनाला उदास करिती, गडे
भल्याचें चालेना त्यापुढें

सदा जिवाची तळमळ चाले कारण कांहीं नसे
मनोमन पटतें हें राजसे

बेभान कधीं का होइल वृत्ती तरी?
आशेची मजला नकोच ती बांसरी
ती मुग्धताच मज नेइल सुखसागरीं

भाव भावनाविहीन व्हावें साधेंभोळें मन
उपाधी नको तयालागुन

९-१०-२७, पुणें.

# प्रणयिनीस

शोक-भार साहुनी
हृदय जात करपुनी
प्रेम रोपडें असें फुलेल कां विलासिनी ?

हृदय करपलें जरी
आणि भंगलें तरी
चित्त कां फिरे पुन्हां एकदां विलोभुनी ?

एकदांच पाहणें
एकदांच बोलणें
एकदांच ठरविणें हृदय चरणिं वाहुनी

हृदय-सिंधु हा जरी
गणि न सिंधु यापरी
एकदांच भरति यास, ओहटी न मागुनी

प्रेमचंद्रमा फुले
आणि हृदय हें खुलें
एकदां विलोभिलें, न तें पुन्हां फिरे गुणी

दोषिलें न सागरास
आणि नाहिं चंद्रम्यास
नीति भिन्न म्हणुनि येथ सांगणें विलोकुनी

सत्त्वशील माणसें
येथ विरल सारसें
एक भाव, एक ठाव तेथ ना दुजा मनीं

मोहुनी मनाप्रती
आणि फसावि दुर्मती
हीच नीति काय जगतिं मान्य जाहली जनीं ?

होइ तूं न गे हताश
पाहुनी अशा स्थितीस
भोग भोगणें असेंच लागतें जगांतुनी

हृदय कठिण वज्रसें
मृदु कधीं न होतसे
हें न तूं मनीं धरी पाहिं गे विचारुनी

प्रेम-पल्लवांतले
मृदुल वात घातले
त्यापुढें टिके कसें कठिण हृदय, साजणी ?

थेंब थेंब पाझरे
तेथ ना दुजे झरे
त्याच शक्तिनें शिला जातसे दुभंगुनी

हृदय काय बापुडें
टिकतसे तयापुढें
मृदुल जातिचेंच तें विरघळे तथा क्षणीं

एवढीच एक आस
सुखविण्यास त्वन्मनास
साहि हाहि कठिण जाच प्रेम हृदयिं ठेवुनी

२६-५-२६, पुणें.

# पौर्णिमा

इंदुलतेची मूर्त मनोरम मन घे मोहून
शीत चांदणें, नव्हे ओतिते सुधाच कुणि वरून

सुधासागरीं विलीन झाला जगताचा जीव
सहज-सुंदरा इंदुलतेचें उमले राजीव

प्रसन्नतेचा गंध दरवळे हृदया हृदयांत
एक सुखाची तिथें भावना पसरे भुवनांत

शुभ्र रुपेरी चहुं बाजूंना मंद तेज पसरे
त्या तेजानें निष्प्रभ झाले नभांतले तारे

या तेजाच्या पलीकडे कां लपला स्वर्लोक ?
अनिमिष नयनें बघतो दुरुनी कीं हा आलोक ?

सुधा-सिंचनें शान्त-रसाची आज पौर्णिमाच
हृदया-हृदयामधुनी उठतो सूर आज तोच

गोड मोहिनी मात्र पसरली चराचरावरती
जीव मोहिले, हृदय लोभलें, आशा मोहरती

अंतरंग-सुमनें हीं फुलली प्रेमलतेवरती
जीवांची मधु बाग बहरली या मंगल जगतीं

सख्या, थांबवी प्रवास, काळा! या सुखसमयाला
आज सुखाची दिव्य पर्वणी लाधे जगताला

नयनांचें हें सौख्य सांठवी आतां हृदयांत
निश्चल झालें विश्व सर्वही त्याच मोहिनींत

चित्त-चकोरा, हृदय-मोहना, ऊठ गड्या आतां
उंच भरारीसरसें गांठी गगनींच्या पंथा

अनंत काळासवें सुखानें इंदुलतेजवळी
सुधासागरीं जीव विरूं दे या मंगल काळीं·

# भावोत्कर्ष

चित्ताच्या नयनाप्रती दिसतसे जें रूप रात्रंदिन
त्याचा भास, नव्हे तसेंच दिसतें प्रत्यक्ष नेत्रापुढें
जीवाची मधु कल्पनाच पुढती घेऊन रम्याकृती
नेत्रांतून मनास कां सुखविण्या ही राहते सन्मुख ?

जातांना पुढती तरूस बघतां आलिंगण्या धांवतो
पाहोनी परि मूक वृक्ष पुढती चित्तामध्यें लाजतो
रामाचा सखि-शोक हन्त हृदयस्पर्शी पुराणांतला
भावोत्कर्ष असा बघून पटतो चित्तास एका क्षणीं

अन्तर्वृत्तिमध्यें तरंग उठती तेजें मनोधारक
त्यांचें दृश्य पुढें मनास दिसतें नेत्रासही मोहक
नेत्रांना बघण्या पुढें कधिं कधीं शक्तीहि ना राहते
शून्याकार पुढें परंतु हृदया हें विश्व सारें दिसे

वृत्तींचा अतिरेक हा सुखमयी वा दुःखदायी ठरे ?
चित्ताला कळतें न हें परि कसें द्यावें तया सोडुन ?

२३-१२-२५, पुणें.

# भलतें वेड

कां वेड असें जीवा भलतें घ्यावें ?
हृदयाला कां शिणवावें ?

मनमोहन हा उडुगण वरती बघुनी
कां चित्त धांव घे गगनीं ?
ती इंदुलता प्रसन्न दिसते आज
हा तिचाच पसरे साज
तिमिरांत वरी प्रवाह तेजोयुत हा
शान्तवितो कां तव हृदया
हें वैभव गगनामधलें
जीवाला कां आवडलें ?
हृदयांत एक तें ठसलें
कां तळमळतो जीव पाहुनी त्याला
वेड ना अन्य हृदयाला

या भूवरती कोमल सुमनें फुलतां
तो गोड गंध दरवळतां
मनमोहन ते विविध रंग देखोनी
नानाविध कुसुमावरुनी
उद्यानपथीं पवन डुलवितो सुमनें
भरवि कां हृदय लहरीनें ?
तो गंध दरवळे हृदयीं ?
वा रंग:मनाला मोही ?
कां मंजु पवन सुख देई ?

या विविध गुणें जीव काय नटवावा
ही आशा लागे जीवा ?

सिकतेंत कधीं बसुनी सागरतीरीं
वा फिरतां तीरावरुनी
रविबिंबाची मोहक लाली वरुनी
शिरते कां अंतःकरणीं ?
हा निमिषाचा खेळ गुलाबी सगळा
सागरांत विरती लीला

मग लाली कुठली हृदया
तिमिरांतचि जाइल विलया
आशेच्या घेउनि वलया
वरि गर्द भरे तिमिर निराशेचा रे
प्रिय कां तुज असले वारे ?

त्या लालीनें हृदय बने बेहोष
जीवाची एकचि आस
हा तिमिराचा पडदा पुढती पडला
अंधविलें मग नयनाला
परि यांतुनिही उषा मधुर हास्यानें
नभ भरेल मग लालीनें

तो एकच आशातंतू
हृदयाचा जीवन हेतु
तेजाचा उज्ज्वल केतू
घरि येइल तो बाल भानु तेजांत
उत्साह भरे जगतांत

# सागरास

किति उंच नभीं, तळपत बिंब सुधेचें
सागरा तुझ्या आशेचें

तव शुभ्र जला किरणांनीं नाचविते
आनंदें तव हृदयातें
हा पूर्णेन्दू हृदयीं सांठविण्याला
कां तळमळ तव जीवाला ?
मधु किरणांच्या कोमल स्पर्शसुखाची
कां आशा तव हृदयाची

त्यासाठिंच मधुलहरींची
मोडुनी शान्तता नभिंची
वृत्तीहि समाधानाची
कां बनवुनियां प्रचंड लाटा वरती
पाठविशी किरणाभंवतीं ?

परि उंच नभीं कराहि भराभर फिरती
तेजांत जावुनी मिळती
तव लाटांचा खळखळाट पृष्ठावरती
त्या फुटुनी शकलें बनती
हें पाहुनिया मुग्ध देवता कोणी
हांसतसे वरती गगनीं

तें हास्य सुधामय गगनीं
किरणांना धाडी भुवनीं
लाटांचें मोतीं करुनी

तव दुःखाला सरळ शुद्ध भावानें
झांकितसे प्रेमलतेनें

जा हृदयाला विचार तूंची अपुल्या
कां भूल पडे तव हृदया
ती दिव्य नभीं राणी प्रेमलतेची
आशा जी तव हृदयाची
या असल्या कां आततायि मार्गांनीं
लाभेल वाटते अजुनी ?
कां प्रचंड लाटा उठतां
हा नाद भयंकर होतां
हे तुफान वारे सुटतां
मनिं भीतीनें घाबरेल कोमल बाला
वाटतें असें कां तुजला ?

हा खेळ असे ? ऊर्मी वा प्रणयाची
ती बाला जिंकायाची
मधु दृष्टिवरी दृष्टि जराशी ठरतां
ये काय कल्पना चित्ता ?
मधुसौंदर्या बघतां नयनापुढती
बावरते कां तव वृत्ती ?
सोडुनी लाजलज्जेला
हृदयाच्या उज्ज्वलतेला
हा मार्ग आसुरी धरला
वा शक्तीची धुंदी नयनावरती ?
उन्मत्त अशी कां वृत्ती ?

# सागरास

किति उंच नभीं, तळपत बिंब सुधेचें
सागरा तुझ्या आशेचें

तव शुभ्र जला किरणांनीं नाचविते
आनंदें तव हृदयातें
हा पूर्णेन्दू हृदयीं सांठविण्याला
कां तळमळ तव जीवाला ?
मधु किरणांच्या कोमल स्पर्शसुखाची
कां आशा तव हृदयाची

त्यासाठिंच मधुलहरींची
मोडुनी शान्तता नभिंची
वृत्तीहि समाधानाची
कां बनवुनियां प्रचंड लाटा वरती
पाठविशी किरणाभंवतीं ?

परि उंच नभीं कराहि भराभर फिरती
तेजांत जावुनी मिळती
तव लाटांचा खळखळाट पृष्ठावरती
त्या फुटुनी शकलें बनती
हें पाहुनिया मुग्ध देवता कोणी
हांसतसे वरती गगनीं

तें हास्य सुधामय गगनीं
किरणांना धाडी भुवनीं
लाटांचें मोतीं करुनी

तव दुःखाला सरळ शुद्ध भावानें
झांकितसे प्रेमलतेनें

जा हृदयाला विचार तूंची अपुल्या
कां भूल पडे तव हृदया
ती दिव्य नभीं राणी प्रेमलतेची
आशा जी तव हृदयाची
या असल्या कां आततायि मार्गांनीं
लाभेल वाटते अजुनी ?
कां प्रचंड लाटा उठतां
हा नाद भयंकर होतां
हे तुफान वारे सुटतां
मनिं भीतीनें घाबरेल कोमल बाला
वाटतें असें कां तुजला ?

हा खेळ असे ? ऊर्मी वा प्रणयाची
ती बाला जिंकायाची
मधु दृष्टिवरी दृष्टि जराशी ठरतां
ये काय कल्पना चित्ता ?
मधुसौंदर्या बघतां नयनापुढती
बावरते कां तव वृत्ती ?
सोडुनी लाजलज्जेला
हृदयाच्या उज्ज्वलतेला
हा मार्ग आसुरी धरला
वा शक्तीची धुंदी नयनावरती ?
उन्मत्त अशी कां वृत्ती ?

हा शोभेना तामस असला चाळा
गंभीर तुझ्या वृत्तीला
हा लाटांचा खळखळाट जों होई
तें बिंब न ठरतें हृदयीं
तो शान्तपणा संथ तुझ्या पाण्याला
येऊं दे या समयाला
मग प्रेमल अन्तःकरणीं
राहील जिवाची राणी
प्रेममयी प्रतिबिंबांनीं
हें गोड म्हणीं हृदय तुझें बनवून
प्रेमपूर्ण बनविल भुवन

२६-१२-२३, दादर-समुद्र.

# शनिवारवाडा पाहून—

हो पहा मृत्तिका येथें । मृत आत्म्यासोबत राही
परि जानजिवाचे दोस्त । राहिले न कोणी समयीं
दशदिशां फांकल्या फांद्या । मग वठला वृक्ष अभागी
परि बोल कुणा लावावा ?
जाब हा कुणी सांगावा ।
हें ठावें त्या दुर्दैवा
तट मात्र एकटा ठेला । स्मृति दुर्दैवाची कथण्या

पायाचे फत्तर सारे । जमिनींत गाडले गेले
त्यावरचें जोतें अजुनी । खंबीरपणानें टिकलें
कारंजें पाण्यावीण । तान्हेलें आजहि ठेलें
परि वरचा सारा इमला
मातींत मिसळुनी गेला
अवशेषहि त्याचा नुरला
स्मृति दुर्दैवाची कथण्या । हतभागी तट हा ठेला

बाजीच्या हस्तस्पर्शें । पायाच्या पाषाणांनीं
निज जीवन स्वार्थ कराया । आत्मार्पण केलें त्यांनीं
तें कृत्य तयांचें लोक । अभिमानें सांगति अजुनी
तो पाया अजुनी आहे
हृदयांत जावुनी पाहे
धगधगित निखारे ते हे
राखेंत बुजाले म्हणुनी । अदृश्य काय नयनांना ?



८८४४

जीवांचा अर्पुनि होम । तो अग्नी चेतविलेला
एकाच चकाकीसरसा । क्षणिं जावा कां विलयाला ?
तिमिराच्या गर्तेमध्यें । सोडुनी सर्व राष्ट्राला
शिवबाच्या पुण्यस्मृतिला
एकदांच कां करण्याला
बाजीची शौर्यज्वाला
भडकली सर्व बाजूंनीं । तेजस्वी जन करण्याला

धगधगित अग्नि वीर्याचा । तो तसाच होता पुढती
फुंकार घालतां मधुनी । तेजाच्या ज्वाला निघती
शतकांत सांठले पुढती । राखेचे थर त्यावरती
ते तसेच अजुनी दिसती
विझविला म्हणुनि या म्हणतां
डोळ्यांवर झांपड ये ती
जाणीव सुप्त वीर्याची । अजुनी न मनाला पटते

निर्जीव पुढें तट दिसती । चेतना जागृती व्हाया
जाहले सजीव न अजुनी । हृदयची परी या समया
अर्थहीन म्हणुनी दिसती । हृदयास पूज्य वस्तू या
ते पडके किल्ले अजुनी
शौर्याचें स्मारक असुनी
मातिमोल गेले ठरुनी
पटतें न परी हें अजुनी । भावनाशून्य हृदयाला

ढळढळा अश्रु ढाळावे । आठवुनी पूर्व स्थितीला
पाहुनी साश्रु नयनानें । आजच्या अशा जनतेला
भाळाला लावुनि हात । कंठिती हन्त काळाला
पाहुनी असा देखावा
कोणीहि न द्रवुनी जावा
हें शोभे त्या दुर्दैवा
परि दैव कसें आठवतें । यत्नवादि या जनतेला

कंठणें प्राप्त तुज झालें । या दुःखद हत काळाला
साहणेंच नशिबीं आलें । ही तीव्र निराशा तुजला
या अनंत काळामध्यें । सोडी न परी आशेला
मग समानधर्मे कोणी
येथुनीच उठतिल अजुनी
जे पूर्व स्मृति आठवुनी
नेतील वैभवा तुजला । त्या स्वतंत्र वातावरणीं

१५-३-२६, पुणें.

# ऊन्ह आणि पाऊस

नभोमंडळिं बांधिलें मांडवातें
रजतधारांच्या चहुं बाजु झालरीतें
हार रत्नांचे त्यास सभोंवार
आज पर्जन्या हौस दिसे फार

खेळ बघुनी करण्यास कौतुकातें
दिव्य सिंहासनिं रविराज मूर्ति येते
मंद किंचित् जाहली प्रभा लोकीं
ऊन पडलें पर्जन्य हा विलोकी

रजतधारांच्या तुषारांमधून
येत ऐकाया धवल यशोगान
शब्द निघती अन्यत्र ना कुठेंही
एक उठतो पडसाद आज पाही

तारकांचे हे पुंज सर्वकाळ
भिउनि रविला दडतात नभाआड
अलग त्यांना बांधून सरामध्यें
कोण गुंफी या दिव्य झालरीतें ?

नयनिं दिसतां वा दृश्य मनोहारी
बघति कुतुकें तारका नभोद्वारीं ?

धरुनि कुठला अदृश्य सूक्ष्म धागा
सरामधुनी येतात भूमिभागा?

बाळ-बाळांचा खेळ जसा कांहीं
दृश्य जातें विलयास तसें पाही
स्वप्न संपे जागृती ये जगाला
निसर्गाचें नव दृश्य पाहण्याला

~~~~~~~
~~~~~~~

# इन्दुलतेस—

[ चंद्राचीं स्थित्यन्तरें डोळ्यांना फसवितात परंतु या भासापलीकडे खऱ्या सृष्टींत चंद्राचें बिंब नित्य व पूर्णच असतें. ]

उसळे सुधा सदाची उजळावया नभाला
तव गोड बिंब गगनीं संतोषवी जगाला
हें सौख्य सांठवाया जागा न अन्तरीं गे
हृदयांत पूर्णतेनें तव पूर्ण बिंब राहे

हतदैव आड येई या सौख्यसागरांत
लपवूनिया कुठेसें ठेवी तुला नभांत
परि अन्तरीं बघाया हो विस्मृती मनाला
धांवे पुढेंच कोठें धुंडाळण्या सुधेला

ठेचाळतां जरासे नयनास जाग येई
तव गोड दर्शनानें जीवास तोष होई
अस्मानि दृश्य जें जें तूं दाविशी जगाला
अंधत्व येउनी तें पटतें खुळ्या मनाला

तव कोर भासवीतें हृदया कलेकलेनें
लपवून देह होशी अदृश्य पूर्णतेनें
मायेमुळें मनाला हे भासही पटावे
दुर्दैव याविणें तें कुणि अन्य कां गणावें ?

तूं नित्य पूर्णतेनें गगनास शोभवीसी
हें जाणण्यास लागे जगिं थोर भाग्यराशी
मायेस आवरी या हतबद्ध वृत्ति होते
नाहीं तुझ्याविणें गे होणार देवते! हें

तव नित्य रूप आतां पटवून दे मनाला
हृदयस्थ देवते! या पुरवीच कौतुकाला

९-१०-२७, पुणें.



४

## गोविन्दाग्रज

भाषेचें बहुमोल लेवुनि शिरीं लेणें मनोहारक
जीवाला वरच्यावरीच झुलवी काव्यांतलें कौतुक
कोठें सुंदर कल्पना सुखविते आणी धडाडी नवी
सर्वांहून विशेष दावुनि कधीं लोकांस आनंदवी

काव्याची नवता जगास पटवी तो केशवाचा सुत
ओजस्वी नव संप्रदाय अपुला काढूनिया अद्भुत
त्याचे शिष्यच सर्व, काव्यविषयीं मानून त्यां चालले
त्यांचीं वंदुनि पाउलें अभिनवा कीर्तीस संपादिलें

आणी बालकवीस प्रेमल-मनें काव्यार्घ्यही अर्पुनी
प्रेमाची जणुं बालमूर्ति म्हणुनी सन्मानिशी वंदुनी
एका मानिति लोक, वर्णिति दुज्या, बाळास प्रीती मिळे
अर्वाचीन कवींत हेच गमती प्रेमूर्तिसे शोभले

प्रेमाची जगीं निर्मिलीस अपुल्या काव्यांत जी मोहिनी
त्यानें मोहुनि वर्णिती तव कृती प्रेमादरानें गुणी

# कल्पना आणि व्यवहार

या कल्पनाच साऱ्या हृदयांत राहणार
जीवास भारवूनी आशेस जोडणार
हें पांखरूं फुकाचें शिणवीत पंख राहे
ना येत त्या उडाया नभ दृष्टिनेंच पाहे

दाही दिशा भरूनी जरि हें उभें समोर
जरि उंच उंच किल्ले जरि वृक्ष थोर थोर
जरि चित्त धांव घेई वरचेवरी नभांत
जड देह त्यास कैसा उचलेल? भारभूत

वाऱ्यावरी उडाया जडता न साहवेच
द्रवरूप देह होई हें जाड्य सोडतांच
हलकी तनू तशी ती नभ आक्रमीत सारें
ते भेटतील प्रेमें शशि, सूर्य आणि तारे

जीवास कल्पनेचे पटतील दिव्य बोल
आशेंत वावराया नभ हें पुढें अमोल

~~~~~~~
~~~~~~~

# ताज-मजल

[ ताजमहाल हिंदूंचा असता तर ? ]

नवरत्नांचा हार अर्पिला तुजला भुवनेश्वरी
ताज भारतीं मेरुमणीसम रुळतो हृदयावरी

सुंदरतेची प्रेमलतेची मैत्री जगतांतुन
एक संस्थिता प्रसन्नतेचें अन्य नसे भाजन

प्रेमलतेचें अर्धोन्मीलित मुकुल इथें सुंदर
कलाविलासें मोहुनि टाकी जगता चेतोहर

नित्य नवी तव कान्ती पसरे प्रसन्न जगतावरी
प्रफुल्ल राहे पुष्प सदाचें भाग्य तुझें हें परी

पुष्पाची परि कशा थोरवी? माधुर्यहि सर्व तें
पाषाणाच्या हृदयीं येथें नाजुकता राहते

भुवनावरती दिव्य बांधिलें तोरण आम्हीं इथें
असंख्य मेरूमणी तोडिले कोणी परि सर्व ते ?

प्रेमलतेचें सुंदरतेचें भाजन जें जें भुवीं
कलाविलासें प्रसन्न हांसें जगताला जागवी

हृदयविदारक दानव हस्तें हन्त लया पातलें
नाम शेषही त्यांचें जगतीं आज न मुळिं राहिलें

भाग्यवान तूं खरा जाणशी मनोवृत्ति मानवी
परधर्माच्या सौंदर्याची खन्त न जेथें भुवीं

सुंदरतेची सौंदर्यास्तव राहे ना मोहिनी
सात्त्विकतेची जाणिव कोठें पटते हृदयान्तरीं

दोष नसे हा तुला ! दाविली मनोवृत्ति पाशवी
पाषाणाचें हृदय मानवी तव जगता मोहवी

यवनकरांचा आश्रय असला उभारतें जीवित
भीति न आता तुला राहिली मरणाची अवनित

हिंदुकरांचा आश्रय असतां तुजला जर या भुवीं
कधींच स्वर्गी उडुनी जाता देह तुझा मानवी

स्वर्ग धरेवर आणायाची आहे तव योग्यता
योग्यचि तव वंदनीं नमविते माथा भू सर्वदा

-----------

# गोपाळ कृष्ण गोखले

ज्याची आज दिगंत कीर्ति पसरे ऐसा महात्मा कुणी
प्रेमें पूज्य गुरू म्हणून तुजला वंदी सदा जीवनीं
भाग्याचें असलें महत्तम कुणा लेणें कधीं लाधलें
आणी शिष्य दुजे कितीक जगतीं लोकांत संमानले

भाषाशैलि मनोहरा रिझविते सर्वत्र जी जीवना
तैशी वृत्ति विरक्त सांग न कुणा देईल संजीवना
मोही तें मनुजास जीवन तुझें जें होय साधेंसुधें
आणी उच्च विचार स्फूर्ति अजुनी देतात लोकामधें

देशाची अतुला करून भुवनीं सेवा स्वतेजोबळें
मागेंही इतरांस तूं स्फुरविशी हें भाग्य कोणा मिळे ?
आहे स्मारक, संघ हा तव इथें जो तूं स्वयें स्थापिला
ज्याचे सेवक आजही सुखविती सोत्साह या भूतला

मानाची पदवी कशास तुजला जो तूं स्वयें भूषण
आहे या भुवनीं स्वयंप्रभ तुझें तें स्थान तेजोगुण

२३-२-३१.

# भग्न-हृदया

[ भविष्यकाळींहि निराशाच पदरीं आलेली दिसून आल्यावर
एका मुग्धेनें केलेला विलाप पाहून ]

चित्रें निर्मुनि कल्पनेंत बघणें वेड्यापरी जीवना
होतां काळ पुढील तो सुखविण्या चित्तांतली कल्पना
सर्वांनीं मनिं वर्णिला अनुदिनीं तो काळ गेला कुठें ?
भावी काळ म्हणून सांग हृदया कोणास आलिंगणें ?

होतें जीवन कल्पनेंत भरलें नेत्रांत जें सांठलें
अन्तर्दृष्टिपुढें नितान्त सुखदा तें दृश्य तेव्हां खुलें
आतां जीवन मात्र तेथ उरलें नेत्रांत जें पाझरे
जीवाचे हृदयास बोल कळती कोठें परी ते झरे ?

वेडावे हृदयस्थ वृत्ति परि ती बाहेर कां येतसे ?
जीवाची समजूत मात्र करणें राहे नशिबीं असे ?
होतें काय ?—तसाच चित्रपट तो नेत्रांपुढें ठाकला
आहे काय ?—न शब्द योग्य गमती वर्णावया त्याजला

कर्तव्यांत निमग्न भग्नहृदया जीवास कंटाळुनी
अश्रूंची नव माळ गुंफित बसे बाला मनोहारिणी

# बालमूर्ति

बाळ खेळे संवगडी सभोंवार
चिमुकल्यांच्या खेळांत दंग थोर
स्वत्व विसरुनि सानांत मिसळण्याचें
भाग्य जगतीं थोड्याच विभूतींचें

सहज सुंदरता तेथ निसर्गाची
मुग्ध मुकुलांतिल मूर्ति जीवनाची
सृष्टि-सुंदरिच्या उत्कृष्ट प्रसूनाची
बाळ-मूर्तीला उपमा न अन्य साची

भाव संयोगें हृदयास मुकुलता ये
बाळ कुसुमें हांसती उषाहास्यें
जीव सृष्टीचा उत्कर्ष बालमूर्ति
हृदयसृष्टीची अत्युच्च भावमूर्ति

# साहित्यसंमेलनास

[ १९३० सालीं गोव्यास झालेल्या संमेलनास उद्देशून ]

आम्ही आज जमूं सहर्ष सगळे साहित्यसंमेलनीं
सौंदर्यास निसर्ग-निर्मित तरी पाहूं चला लोचनीं
कार्यें थोर कितीक तेथ दिसती साहित्ययज्ञामधें
लावू हात जरा मिळेल बरवा पुण्यांश कार्यामधें

पुष्पें नित्य नवीं फुलून जगतां उत्फुल्लवीती स्वयें
त्यांचें तें लहरी जिणें म्हणुनिया त्या मानिती आदरें
कांटेरी झुडुपावरी फुलुनिया कोमेजतां एकटें
सेवी कोण सुगंध त्यापरि तसें तें रूपही गोमटें

तीं सारींच फुलें मनोरम खरीं आणून लावूं घरीं
बागा आंखुन मांडणी बहुविधा व्हावी अतां सत्वरीं
जें जें वाङ्मय स्फूर्तिदायक मना उत्साह-आनंद दे
त्याचीं योग्य परीक्षणें पसरितां आल्या मना तोष दे

आतां कार्य करा नवोदित जनां आणा पुढें सत्वर
स्वार्थाला झिडकारुनी धन कुणी वेंचा तयाखातर



मराठी ग्रंथ संग्रहालय
स्थळ प्रत
सं. ........ नं. ........
ता. ........

# पं. मोतीलाल नेहरू

मानाची पदवीच ना उरतसे ज्याच्या गुणा लागुनी
एखादाच कुणी असा निपजतो लोकांमधें अग्रणी
ज्याचें नांव जगामध्यें दुमदुमे ऐसा महात्मा कुणी
सेवाया तुज सज्ज आज असतां जाशी कसा येथुनी ?

अर्थाचा अभिलाष काय जगतीं होतो कुबेराप्रती ?
स्वार्थत्याग न नांव त्या, निरुपमा ती होय कर्ण-कृती
लीलेनें परि या कृती करुनिया जाशी द्युलोकान्तरीं
आश्चर्यें बघतांच शीर्ष नमतें धन्या कृती ती खरी

लोकीं एक, दुजें मनांत, असले लाखों जगीं जाहले
पोषाखी परि वीर ते अनुदिनीं काळाननीं लोपले
ज्याला दुःसह मान आणि पदवी ऐसा न लोकीं क्रम
राष्ट्रें ज्यास हपापलीं निशिदिनीं कोठें असा विक्रम ?

राजेही श्रमले कितीक जगतीं भाग्यास ज्या भूवर
त्याचा त्याग जगांत तूंच करिशी, हें भाग्य लोकोत्तर

# नांवाची जादू

[ अविनाश हेंच नांव अन्य कवीनें घेतलेलें पाहून ]

सृष्टी आजवरी जुनीच असतां कां भासते सुंदर ?
नाविन्यांतच राहतें, श्रुत असे, सौंदर्य चेतोहर
कां हें सत्यचि मोहमुग्धहृदया आभाससें भासतें
सौंदर्यें दिपतांच नेत्र नवता सृष्टीमधें वाटते

पुष्पाचाच विकास कां जगिं सदा कोमेजतो सत्वर
आहे हें क्षणभंगुरत्व नशिबीं त्याच्याच कां भूवर ?
मुग्धेची नवता विलीन परि ती होते स्वबालेमधें
होतें सान्त्वन दृश्य पाहुनि असे, प्रेमांत ती मोहते

चंद्राचें बदले स्वरूप परि तें नाविन्य ना पालटे
नाविन्यांतच मौज मात्र तसलें नाविन्य आहे कुठें ?
त्याचें नांवच 'प्रेमला' मिळविते जादू तिथें कोठली ?
मोही तें परि वल्लभास, नवता तेथेंच त्या भासली

आहे नांव जुनेंच तें परि मना नाविन्य संमोहितें
नाहीं नाश कधीं तयास जगतीं कां खिन्नता राहते ?

२७-११-२९, पुणें.

# स्फूर्ति

स्फूर्तीचीं किरणेंच मात्र हृदया देतात संजीवन
एखादेंच स्फुरे जगांत असलें तेजोमयी जीवन
स्फूर्ती मूर्तिमती सदा अवतरे निःस्वार्थ कार्यामधें
उत्साहांत मनामधें क्षण तरी नैराश्य कां संभवे ?

आशा एकचि कार्यतत्पर मना निश्चित तें एरवीं
आनन्दी कधिं वृत्ति ती बदलते ही केवढी थोरवी
झोले ते सुखदुःखयुक्त बसती संसार-जालांतुनी
राष्ट्राच्या नशिबीं प्रसंग असले येतात रात्रंदिनीं

शत्रूच्या हृदयास जाच असतो आंतून बाहेरुनी
मित्रांचीहि सहानुभूति उरते अत्यल्प त्या जीवनीं
येती कंटकयुक्त मार्ग क्रमितां तीं संकटें आडवीं
स्वत्वस्थांस न आडवूं शकतसे शक्ती परी पाशवी

आहे भास्कर तो स्वयंप्रभ, म्हणो त्यातें महात्मा कुणी
स्फूर्तीची कुठुनी उणीव असतां देशांत विद्वन्मणी ?

# दर्पण

खेळावया देतां जरी बहुमोल मोहक बाहुली
नसतां मनीं रुसुनी बसे ऐकेच ना क्षण तें मुळीं
गुणवन्त हें सुखवी मना जरि त्रासुनी झिडकारतें
लटकेंच हें रडुनी कसें मन सत्वरीं शिशु मोहतें

समजावितां सुखदायिनी माता स्वयें आनंदुनी
कुरवाळितां मुख झांकिते स्तनपानही ना ये मनीं
प्रतिबिंब सुंदर पाहण्या करितां पुढें परि दर्पण
रडणें कुठें परि राहतें करिं खेळवी मृदु हांसुन

मुख लावुनी मुख चुंबितां सुख होतसे आत्यंतिक
मुकुरामधें मुख येतसे कुठुनी असें मनमोहक ?
आभास हा मायाच कीं ही कल्पना नाहीं मुळीं
प्रत्यक्ष हें पुढती असें शंका कुठें मग राहिली ?

ना कल्पना ना भावना मन शुद्ध सुंदर आरसा
बघतां तिथें कृति आपुली अपुलेपणा राहे कसा ?
देणें निसर्गाचें असें निष्काम प्रेमोपायन
घेई कशाचेंही असें आनंदुनी शिशु-चुंबन

२२-४-२९, पुणें.

# हरि नारायण आपटे

वेदांची नवता अजून जगतीं आनंदवी जीवना
लोटे काळ कितीक निष्क्रिय पुढें माहीत नाहीं कुणा
त्यांनीं वैभव भोगिलें परि अतां दास्यांत जाई जिणें
भाळा लावुनि हात शान्त हृदयें हा काळ कां कंठणें ?

कां हें अंतर स्पष्ट होत असतां कोणासही ना कळे ?
कां हें स्पष्ट कुणी जगास कथिलें नाहींच भीतीमुळें ?
सांगे धीट कुणी परी न पटतें लोकांस तें संप्रतीं
कोणी कां उपदेश व्यर्थ जगतीं ऐकून घेतो सुधी(?)?

त्या त्यांना घरच्याच गोष्टि कथणें त्यांच्याच शब्दांमधीं
आहे हेंच समाजकार्य, कळलें नाहीं परी हें कधीं
स्वत्वाची जनतेस हीच करुनी जाणीव तूं सत्वर
केलें जीवित सार्थ कार्य करुनी लोकांत चेतोहर

लोकां आदरणीय निर्मल स्वयें जें निर्मिलें वाङ्मय
त्यानें मोहुनि वर्णिती तव कृती सानंद तेजोमय

# विजयिनी

मधु नयनिं
हळुच पाहुनी
कोण सामोरा ?
शस्त्रास्त्रें करिशी मारा । कां असें ?

निमिषांत
शत्रु निःपात
बाण-संपातें
कसलेंसें हृदयीं होतें । कां असें ?

विजयिनी
परी लाजुनी
शरण कां रिघशी
विजयाचा गर्व न तुजशा । कां असें ?

अर्पिशी
देह करपाशिं
हृदय हृदयाशीं
स्वत्वाला विसरुनि जाशी । कां असें ?

“ अद्वैत
मीलनीं होत
विजय तो कसला ? ”
लाजुनिया वदशी बोला । कां असें ?

मराठी ग्रंथ संग्रह
स्वतंत्र प्रत
सं. ........ नं. ........
ता. ........
दा.क्रं.

विजयिनी
तूंच साजणी
करीं तव राही
प्रेमध्वज हृदयीं पाहीं । सर्वदा

तें प्रेम
दिव्य हृत्पद्म
गंध दरवळतां
विजयाची कुठली वार्ता । राहते

जगतांत
पसरला सतत
प्रेम-पद्माचा
तो गंध दिव्य हृदयांचा । सारखा

५-१२-२४, कुर्ला.

# स्वातंत्र्यशाहीर गोविंद यांस

चंडोला! नव स्फूर्ति तूं स्फुरविली स्वातंत्र्य-तेजासवें
स्वत्वाची हृदयास तूं पटविली जाणीव लोकीं जवें
विद्या तेथ नको, नको सुखमयी लोकांतली थोरवी
येतां स्फूर्ति उचंबळोनि हृदयीं शक्तीहि येते नवी

कोणी कां तुजला अशिक्षित गणी विद्येविना संप्रती ?
विद्यावन्त न ते सुखांत जगतीं दास्यामधें लोळती !
झाले पाय लुले, करांत न परी शक्ती मुळीं राहिली
जीवाची तव शक्ति एकवटुनी वाचेंत संस्थापिली

जे जे बोल तुझ्या मुखांत स्फुरले ते दिव्यता पावले
स्फूर्तीचा सुखसोहळा पुरविला त्यांशीं न कांहीं तुले
दुर्दैवें परदास्यदूषित अम्हां त्याची न ये कल्पना
दिव्यत्वांतुनि दावि सोज्ज्वल तुझें सौंदर्य या लोचना

आशीर्वाद तुझाच येउनि फळा तीं बंधनें तोडुन
सौंदर्यें विलसो नवोदित तुझें तें रूप रात्रंदिन

३-३-३०.

# प्रणाम

होतो काय फकीर कोण जगतीं राजा स्वदेशांतला?
स्वार्थत्याग तयास कोण म्हणतो संपत्ति येतां घरा?
संसारी असुनी विरक्त गणिती संन्यास त्यातें नको
आहे भिन्न स्वभावधर्म परि तो एकांत सामावतो?

काळा! दुःसह निष्क्रियत्व तव बा, जाणून कोणी तरी
युक्तीनें तुज जिंकुनी तव करीं सत्कार्य कोणी करी
केव्हां तो शिवबा स्वदेश स्वजनां स्वातंत्र्य देण्या झटे
केव्हां मोहन मोहमुग्ध हृदया उत्फुल्लवीतो जवें

तत्वज्ञान नवीन योजुन कुणी लौकीक वृत्तींतुनी
आमूलाग्र मनाप्रती फिरवुनी अर्पीत संजीविनी
होते आड कितीक ते ढग परी सारून त्यांना दुरी
सूर्याचीं किरणें स्वयंप्रभ पुन्हां आलीं नभाभीतरीं

गेलें तें शरदभ्र आज नव ही मूर्ती दिसे गोजिरी
भक्तीनें तुजला प्रणाम करितों स्वीकार त्याचा करी

फेब्रुवारी, १९३१.

# सूर्योदय

गोड चांदणें पडलें होतें धरा सुधेनें न्हाली
पहांट होती परी न अजुनी साखरझोंप निमाली
उषःकालचा मंद उबारा हृदया सुखवित होता
शीतल वायू शान्त जाहला गाणें गातां गातां

निळ्या नभाची कडा मनोरम माखे लालीमध्यें
मोहत होत्या नवथर लहरी आशेच्या हृदयातें
डोळ्यांवरती नीज लाजरी अजुनी नाचत होती
स्वप्नामधलें सौख्य तरंगत होतें नयनांपुढती

मोहमुग्धता आली होती प्रेमल वातावरणीं
मूढ जाहले जीव कशानें कळलें नाहीं अजुनी
उषःकालचें गीत गावया उत्सुकता सृष्टीला
शान्त चराचर सारे सजले श्रवण्यातें गीताला

समय सुखाचा बघुनी असला प्रेमल हृदयें मिळतीं
दिनरजनींची भेट मनोरम हृदया मोहित होती
दिनहृदयीं जों विलीन होते रजनी केवळ छाया
प्रेमलतेचा पुरा पटविते भाव सर्व जगता या

उज्ज्वलतेची, पावित्र्याची, मांगल्याची मूर्त
प्रेमाचें हें दिव्य रूप जगिं आहे उपमातीत

लालीचा जणुं गोड मुलामा रविरश्मींना देत
गुलाल उधळित होती जगतीं प्रेमलतेची मूर्त

लालीमधुनी रविही आला हांसत हांसत वरतीं
नवचैतन्यें उधळित उठली सृष्टी मंगल जगतीं

--------

# आकाशगंगा

शान्तीची रमणीयता पटविण्या ही यामिनी पातली
कोठें अस्फुट चांदणें, तिमिरही आणी कुठें काळिमा
प्रेमाच्या लहरीच कां पसरुनी हीं मौक्तिकें सांडिलीं
चित्ताच्या मधु कल्पनाच फुलती वा व्योमपुष्पांमधें

प्रेमाच्या नयनांस एक दिसतें हें चांदणें सर्वदा
काळेंकुट्टहि दाटलें तम कुठें, त्याची न याला क्षिती
वाहे दुग्धप्रवाह लक्ष सगळें जो वेधतो अंबरीं
या साऱ्या गगनामधें पसरली आकाशगंगा अशी

ताऱ्यांचें मधु तेज त्यांत खचलें त्यानेंच कां शुभ्रता
शान्तीचेंच अमूर्त रूप दिसतें वा शुभ्र कान्तीमधें
दिव्यात्मे फिरतात काय गगनीं या दिव्य मार्गावरी
दावाया हृदयास दिव्य पुढती आदर्श वा निर्मिला

प्रेमाची मधु कल्पनाच अथवा घे मूर्त रूपाप्रती
शान्तीच्या समयास वा शिकविते प्रेमादिकांचे धडे

८-११-२३, मिरज.

# विरोधाभास

जीवाचें मधु तेज लोचन जणू अश्रूमधें सांठवी
दुःखीं स्तब्ध कधीं, कधीं सुख तया बाहेरही आणवी
वृत्तींची असली विभिन्न जगतीं होते स्थिती अन्तरीं
भावोत्कर्ष पटे मनास, जुळतां हे योग केव्हां तरी

सूर्याचे प्रखरांशु शीतल कधीं कोणास का भासले ?
चंद्राचें मधु तेज दाह करण्या कोणा तरी सज्जलें
आहे भिन्न स्वभावधर्म परि तो एकांत सामावतां
सृष्टीच्या नियमांत सूक्ष्म गमती हे भेद का तत्त्वतां ?

सारें जीवित दानशून्य असतां अत्यल्प खर्चीं कुणी
लाखांनीं धन वेंचितो सकलही देशार्थ एका क्षणीं
झाली ही कृति भूषणावह जगीं धन्यत्व त्या पातलें
आहे मात्र विरोध-भास अथवा आभास हें नाकळे

स्वार्थत्याग † तुझा चिरस्मरणदा होईल लोकीं सदा
झाली सार्थ, सुरेन्द्र ! दिव्य तव या नांवांतली उच्चता

† सुरेन्द्रनाथ बॅनर्जींनीं मृत्युसमयीं आपली सगळी इस्टेट धर्मादाय दिली हें वाचकांना माहीत आहेच.

२७-४-२८, पुणें.

# लकडी पूल

[ नवें व जुनें पुणें सांधणारा हा दगडी व लोखंडी पूल आहे. याच्या नांवांत कोणाला दांभिकपणाचा वास आला तर तो लोकवार्तेचा दोष आहे; पूल अर्थात् निर्विकारच असणार ! ]

**आहे भाव मनांतले वद्‌विण्या प्रत्यक्ष सृष्टींतले**
**काळानें तुजला प्रतीक म्हणुनी दृष्टीपुढें ठेविलें**
**रूपाची तव जाहली विघटना केव्हां कळे ना जना**
**आहे वा पहिलेंच रूप तव हें माहीत नाहीं कुणा?**

**आहे तीच परंपरा परि तुझ्या नांवामधें जागती**
**प्रत्यक्षास विरुद्ध हो कृति जरी आम्हां पटे सर्व ती**
**किंवा कार्य करून दाविशि असें प्रत्यक्ष लोकांप्रती**
**नांवाची महती नसे, विनय हा शोभे तुला संप्रती**

**मोठेंही परि कार्य तो न वद्‌तो सत्वस्थ लोकांतुनी**
**अल्पत्वांतहि धीट तो बडबडे गर्विष्ठ आनंदुनी**
**कार्यारंभप्रवीण लोक दिसतां तूं मार्गदर्शी पुढें**
**का देतोस विनम्रवृत्ति बनण्या उन्मत्त लोकां धडे?**

**वृत्ती ही द्विविधा तुझी बघुनिया व्यामोहतें अन्तर**
**का सत्त्वात्मक भूमिका तुज तरी द्यावी न लोकोत्तर?**

# गोड भास

[ खिडकीसमोरील फुलाच्या दुकानीं विविध तऱ्हेचीं फुलें दिसतांच,
निरनिराळ्या रंगांच्या कागदांत लपेटलेलें चाकोलेटच कीं काय
या समजुतीनें एक बाला तें खावयास मागत असलेली पाहून ]

पाहे समोर बसुनी खिडकींत बाला
आनंद फार बघतां क्षणि हो तियेला
'खाऊ पहा किति तरी' म्हणुनी मजेंत
ती दाविते चिमुकले पसरून हात

होतीं गुलाब-सुमनें परडींत तेथें
उत्फुल्ल तेज नयनां दिपवीत होतें
जाई जुई विविध तीं सुमनें अनेक
तो थाटमाट पुढती दिसतो सुरेख

वाटे वड्याच तिजला वरि मांडिलेल्या
कीं शर्करेंत मिसळून तयार केल्या
ते रंग सुंदर तसे विविध प्रकारें
खाऊच ते बनविले गमतात सारे

घाई तिची बघुनि हो सुख मानसास
नाहीं तरी म्हणुं कसें परि बालिकेस
तो गोड भास तिचिया हृदयान्तरींचा
कां सत्य सांगुन तरी बदलेल साचा ?

तीं सत्य सुंदर फुलें मिसळून ज्यांत
आभासरूप मिळतें मग शर्करेंत
आणूनिया मग तिला गुलकंद गोड
केलें तिचें सहजची सुख तेंहि गोड

आभास हा फसवितो हृदयास सारा
त्याचाच हा पसरला जगतीं पसारा
सत्यार्थ बोध परि कोण करून घेई ?
मायेमुळेंच जगतीं व्यवहार होई

जीवीत जात अवघें सुख शोधण्यांत
दुःखांतही विलसतें सुख हें जगांत
तें सत्य कोण बघतो, समजून घेतो ?
दुःखास कोण जगतीं कवटाळतो तो ?

सत्यांतही सुख असे कळण्यास हेंही
उत्कर्ष वृत्तिमधुनी अजुनी न होई
तें सत्य गोड वरि भासहि गोड तोही
वेळा अशी विरळ ये जगतांत पाही

# विवाह आणि प्रेम

लग्नाचा सुखसोहळा करुनिया बाला समर्पी कुणी
नाहीं ज्ञान जगांतलें अणुभरी, ती अष्टवर्षा गुणी
जातें जीवित सर्वही सुखमयी संसार हो चांगला
आणी काय इवें विशेष जगतीं? माहीत नाहीं तिला

आतां शिक्षणही मिळे विविध तें शास्त्रें, कला-संगित
ज्ञानाचा नुसता न डौल परि तें राहे सदा अंकित
सारासार विचार सर्व कळतो, बुद्धि प्रगल्भा असे
प्रेमादी मधु भावना सुखमयी ती सर्व जाणीतसे

विद्या, ज्ञान, जगांतल्या सकलही त्या भावना सोडुन
येणाऱ्यापुढती निमूट बसणें आलें नशिबीं पण
मुग्धांचें परि लग्न हें सकलही जीवीत नेतें लया
बालांचा परि तोष तोहि न मिळे ही काय त्यांची दया

प्रेमाची न कळे कुणास असते लोकीं अपेक्षा परी
त्याचा काय तसा विवाहसमयीं संबंध आहे तरी?

# हे व्यर्थ झाले श्रम !

[ लग्नाच्या बाबतींत आपण ज्या स्थळासाठीं हेलपाटे घालतों त्याच योग्यतेचें स्थळ आपण होऊन चालत आलें तर तें जुळविण्यासाठीं माणूस तितकासा उत्सुक नसतो. हा स्वभावविशेष दाखविण्या-साठीं नाट्यगीताच्या रूपानें हें मडक चित्र रंगविलें आहे. ]

' बी. ए. होउन वर्ष आज पुरतें होऊन गेलें असे
बाळेचें गुणगान मींच करणें शोभेल आतां कसें

कान्ताचें स्थळ-पाहिलें, बहुगुणी तो बाळ आहे तरी
श्रीमन्तासमवेत जाउन तिथें आतांच आलों घरीं

या, येथें, उपनांव काय तुमचें ? वा ! काय तें रानडे ?
तुम्ही होउन पातला ! समजलों ! सौजन्य हें केवढें !

आले कान्त ? कशास व्यर्थ तसदी अन् हेलपाटा तरी
मी आलों असतों तुम्हां पुरविण्या ती माहिती सत्वरीं

तुम्ही कान्त ? उगीच आज इकडे आलांत कां भेटण्यां
व्हावी ओळख अन् परस्पर असा वा स्नेह का वाढण्यां

नाहीं बाळ कशी तरी उजविण्या वाटेंत मीं सोडिली
यावें अन् कुणिही तिला उचलुनी न्यावें करां ओढुनी

साहेबासमवेत कां न मग हो इंग्लंड केलें घर
एखादी तुज गौरकाय मिळती हे व्यर्थ झाले श्रम ! '

# विवाह आणि प्रेम

लग्नाचा सुखसोहळा करुनिया बाला समर्पी कुणी
नाहीं ज्ञान जगांतलें अणुभरी, ती अष्टवर्षा गुणी
जातें जीवित सर्वही सुखमयी संसार हो चांगला
आणी काय हवें विशेष जगतीं? माहीत नाहीं तिला

आतां शिक्षणही मिळे विविध तें शास्त्रें, कला-संगित
ज्ञानाचा नुसता न डौल परि तें राहे सदा अंकित
सारासार विचार सर्व कळतो, बुद्धि प्रगल्भा असे
प्रेमादी मधु भावना सुखमयी ती सर्व जाणीतसे

विद्या, ज्ञान, जगांतल्या सकलही त्या भावना सोडुन
येणाऱ्यापुढती निमूट बसणें आलें नशिबीं पण
मुग्धांचें परि लग्न हें सकलही जीवीत नेतें लया
बालांचा परि तोष तोहि न मिळे ही काय त्यांची दया

प्रेमाची न कळे कुणास असते लोकीं अपेक्षा परी
त्याचा काय तसा विवाहसमयीं संबंध आहे तरी ?

# हे व्यर्थ झाले श्रम !

[ लग्नाच्या बाबतींत आपण ज्या स्थळासाठीं हेलपाटे घालतों त्याच योग्यतेचें स्थळ आपण होऊन चालत आलें तर तें जुळविण्यासाठीं माणूस तितकासा उत्सुक नसतो. हा स्वभावविशेष दाखविण्यासाठीं नाट्यगीताच्या रूपानें हें भडक चित्र रंगविलें आहे. ]

'बी. ए. होउन वर्ष आज पुरतें होऊन गेलें असे
बाळेचें गुणगान मींच करणें शोभेल आतां कसें

कान्ताचें स्थळ-पाहिलें, बहुगुणी तो बाळ आहे तरी
श्रीमन्तासमवेत जाउन तिथें आतांच आलों घरीं

या, येथें, उपनांव काय तुमचें ? वा ! काय तें रानडे ?
तुम्ही होउन पातला ! समजलों ! सौजन्य हें केवढें !

आले कान्त ? कशास व्यर्थ तसदी अन् हेलपाटा तरी
मी आलों असतों तुम्हां पुरविण्या ती माहिती सत्वरीं

तुम्ही कान्त ? उगीच आज इकडे आलांत कां भेटण्यां
व्हावी ओळख अन् परस्पर असा वा स्नेह का वाढण्यां

नाहीं बाळ कशी तरी उजविण्या वाटेंत मीं सोडिली
यावें अन् कुणिही तिला उचलुनी न्यावें करां ओढुनी

साहेबासमवेत कां न मग हो इंग्लंड केलें घर
एखादी तुज गोरकाय मिळती हे व्यर्थ झाले श्रम !'

# धर्माची महती कशास !

[ भिन्नधर्मीय लोकांचे दंगे पाहून हे विचार सुचणें शक्य आहे ]

होतां शान्त अथांग सागर परी कोठून हो वादळ ?
अन् भेसूर विजा कडाडुनि पडे पर्जन्य सृष्टीवर ?
होतें शान्त वरून सर्व म्हणती प्रत्यक्ष चोंहींकडे
आवेशें परि सर्व तें उसळतां थैमान माजे पुढें

कोणाचा अविचार यांत अथवा उद्देश कांहीं तरी
मुंग्या त्या चिरडून पाय पडतां जाती क्षणाभ्यन्तरीं
धर्माचा उभवी कुणी तट पुढें, निःस्वार्थ कोणी असे
आशा-पाश कितीहि सूक्ष्म परि तो लोकांस सारा दिसे

देवाला पटतें न वा ? कळतसे हें का कुणाला तरी ?
कोणी भाविक मात्र दैव फिरतां दुःखें निराशा वरी
त्यांचें तें परि कार्य ना बदलती, ना जाणती ईश्वरा
तत्त्वज्ञान, विचार, नीति अवघी ती पारखी अन्तरा

धर्माची महती कशास न जिथें नीती उरे अल्पही ?
नांवानें फसवावयास जगतां हें बाहुलें प्रत्यहीं

# साहित्यसम्राट केळकर

[ केळकर-ग्रंथसमर्पण करण्यासाठीं भरलेल्या सभेंत
खालील विचार सुचले ]

कोणी संस्मरणीय कार्य करितो स्वातंत्र्य-संपादनीं
साहित्यांतहि नांव तें दुमदुमे आहेत ऐसे गुणी
त्यांचा तो दिसतो समन्वय जगीं भाग्येंच केव्हां तरी
लाधे भाग्य तुला म्हणून असशी तूं वंद्य या भूवरी

आहे सार्थ तुझीच आज पदवी 'साहित्य-सम्राट' ही
राजे येथ सभोंवतीं विलसती, तारेच किंवा नभीं
त्यांचें तेज जयामुळें पसरलें तो तूंच होशी रवि
त्यांनाही परि मानिशी विनय हा, ही केवढी थोरवी

ज्यांची वृत्ति, उपेक्षणीय तव हें कर्तृत्व मानीं जनीं
त्यांचे पाय तुझ्याकडेच वळले त्वत्कीर्ति संपादनीं
आला ओघ प्रचंड, दर्शन तुझें घेण्यास या मंदिरीं
आहे हा जनताजनार्दन तुझा संतोष हा अन्तरीं

कांहींही तव राजकारण असो, तेंही जनीं मानिलें
साहित्यांत न मात्र आज दुसरा सर्वत्र हें ऐकिलें

२५-८-३२, पुणें.

REFBK-0004945
REFBK-0004945

## महात्मा गांधी

नांवाची तव ती कळे न मनुजा जादू मनोहारक
कार्यांचेंच तुझ्या अलौकिक असे सामर्थ्य तें सात्त्विक
ती आणून ऋषिप्रणीत जगतीं योग्य प्रणाली स्वयें
सारे मार्ग जुनेच तेच परि तूं चोखाळिशी निग्रहें

साधाही व्यवहार आज परि त्या दिव्यत्व जें येतसे
ती संन्यस्त मनःप्रवृत्ति जगतीं हें कार्य साधीतसे
होती ऐहिक भोग मृण्मय तुला, आशा न त्यांची मनीं
अन्यांना करुनी गुलाम जगतीं जे धन्य होती क्षणीं

अन्तर्बाह्य पवित्र जीवित तुझें पौरस्त्य संतासम
आणी आधुनिकांतलें मिसळलें औचित्य तें उत्तम
आहे जास्त ऋषीहुनी, सकलही अध्वर्यु लोकांहुनी
तें सामर्थ्य नवें तुझ्यांत, सुयशें होई प्रभावी जनीं

बुद्धाची उपमा, कशास असली आतां उपाधी हवी
तत्त्वज्ञान, विचार आणि तव ती वृत्तीच सारी नवी

२९-९-३२, पुणें.

४६४५

## संकलित प्रकाशन

१ आचार्य प्रफुल्लचंद्र रॉय [ चरित्र ]

२ वैद्यक-शास्त्रांतील संशोधक

माझा मऱ्हाठाचि बोल कौतुकें
परि अमृतातेंही पैजा जिंके
ऐशीं अक्षरें रसिकें मेळवीन ॥ १ ॥

—ज्ञानेश्वर.